# विदग्ध वाङ्मय.

( मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या तेराव्या वार्षिक सभेपुढें दिलेलें व्याख्यान. )

ह. ना. आपटे.

पुणें.

आर्यभूषण छापखान्यांत रा. नटेश अप्पाजी द्रवीड यांनीं छापून रा. ह. ना. आपटे यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

सन १९११.

किंमत ३ आणे.

कै० विष्णु कृष्ण

ऊर्फ

तात्यासाहेब भाटवडेकर

यांचे स्मरणार्थ.

# विदग्ध वाङ्मय.

( मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या तेराव्या वार्षिक सभेपुढें दिलेलें व्याख्यान. )

मुंबई मराठी ग्रं. सं.
४३७ ब नार
ता. नों. २८५०

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या १३ व्या वार्षिक सभेच्या दिवशीं म्हणजे ता. २६ नोव्हेंबर १९११ रोजीं त्या सभेपुढें कांहीं तरी वाङ्मयात्मक विषयावर व्याख्यान द्यावें अशी रा० विष्णु कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब भाटवडेकर यांनीं त्या ग्रंथसंग्रहालयाच्या व्यवस्थापकांच्या तर्फे मला विनंति केली. ती मीं मान्य केली आणि " विदग्ध वाङ्मय " या विषयावर व्याख्यान दिलें. अध्यक्षस्थानीं नामदार श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर हे होते.

ग्रंथसंग्रहालयांतून कोणतीं पुस्तकें किती वाचलीं जातात तें दाखविण्यासाठीं त्या संस्थांच्या रिपोर्टांत एक कोष्टक दिलेलें असतें. कोणत्याही ग्रंथसंग्रहालयाच्या–मग तें संग्रहालय इंग्लंडांतलें असो, कीं हिंदुस्थानांतलें असो–रिपोर्टांत दिलेल्या अशा कोष्टकांत पहातां काव्यें, कादंबऱ्या, नाटकें वगैरे विदग्ध वाङ्-

मय या सदराखालीं जाणाऱ्या पुस्तकांवरच वाचकांचा भर फार असतो असें दिसून येतें. कित्येकांस ही गोष्ट अनिष्ट वाटते.

माझ्या मतें ही गोष्ट अनिष्ट नाहीं. शिवाय ती गोष्ट मनुष्यस्वभावास अनुसरून आहे. ज्यांस लोकशिक्षणाची इच्छा असेल त्यांनीं या मनुष्यस्वभावाचा फायदा करून घेऊन इष्ट कार्य घडवून आणावें. तें इष्ट कार्य घडवून आणण्यास विदग्ध वाङ्मय हें उत्तम आणि फार महत्वाचें साधन होय.

हें श्रोत्यापुढें मांडावें म्हणून मीं तोच विषय घेऊन त्याचें विवेचन केलें.

व्याख्यान ऐकल्यावर कित्येक श्रोत्यांनीं व मित्रांनीं तें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावें अशी सूचना केली. मूळ व्याख्यान दिलें त्या वेळीं केल्यापेक्षां कित्येक मुद्यांचें अधिक सविस्तर विवेचन सध्यां केलें आहे.

पुणे,
२३ डिसेंबर १९११.

ह. ना. आपटे.

वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।
रसिकत्वीं हि परतत्व । स्पर्शु जैसा ॥

—श्रीज्ञानेश्वर यथार्थदीपिका १८ ३४७

कवित्व नसावें वादांग । कवित्व नसावें रसभंग ।
कवित्व नसावें रंगभंग । दृष्टांतहीन ॥
कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ ।
कवित्व असावें प्रांजळ । अन्वयाचें ॥
मृदु मंजुल कोमळ । भव्य अद्भुत विशाळ ।
गौल्य माधुर्य रसाळ । भक्तिरसें ॥

—श्रीसमर्थ-दासबोध १४-३.

The poet's eye in a fine frenzy rolling,
Doth glance from heaven to earth, from earth to heaven ;
And, as imagination bodies forth
The forms of things unknown, the poet's pen
Turns them to shapes, and gives to airy nothing
A local habitation, and a name.

*Shakespeare*—A Midsummer Night's Dream Ac. V Sc. I.

# विदग्ध वाङ्मय.

आठ वर्षें होऊन गेलीं, ठाणें येथील ' मराठी ग्रंथसंग्रहालया 'च्या व्यवस्थापकांनीं त्यांच्या वार्षिक वाग्यज्ञाचे वेळीं मला पौरोहित्याची सुपारी दिली होती, त्या वेळीं मीं "**मराठी वाङ्मयाचा अभ्यास**" हा विषय घेऊन मला जे काय दोन शब्द सुचले ते महाराष्ट्राच्या पुढें ठेविले. त्या व्याख्यानाचे प्रारंभीं मीं ग्रंथसंग्रहालयांची उपयुक्तता काय असते हें दाखविलें, आणि वाङ्मय ह्मणजे काय याबद्दलची माझी कल्पनाही श्रोत्यांपुढें शब्दांनीं व्यक्त करून तिला एक प्रकारचें मूर्त स्वरूप दिलें.

## ग्रंथसंग्रहालयें.

ग्रंथसंग्रहालयें हीं मानवी पराक्रमांचीं स्मारक मंदिरें होत. ' मानवी पराक्रम ' या शब्दांचा अर्थ मात्र फार व्यापक घेतला पाहिजे. साधारणतः 'पराक्रम' या शब्दाचा विनियोग शारीरिक धैर्याच्या कृत्यांकडे करतात. परंतु मीं

## विदग्ध वाङ्मय.

या शब्दाचा अर्थ फार व्यापक करून त्याचा आतां उपयोग केला आहे. मानवी पराक्रम म्हणजे केवळ रणांगणांत शत्रूंवर गाजविलेले पराक्रम नव्हत. तर या जीवितरणांगणांत जे जे शत्रु उत्पन्न होतात त्यांजवर गाजविलेले पराक्रमही त्यांत धरावयाचे. जीवितरणांगणामध्यें सर्वांत मोठा शत्रु म्हटला म्हणजे अज्ञान. या अज्ञानशत्रूशीं मानवप्राणी आज युगानुयुगें एकसारखें युद्ध करतो आहे. त्याच्या मृत्यूला कारणीभूत होईल अशा साधनांचा शोध लावण्यासाठीं त्याची एकसारखी धडपड चालली आहे. प्राचीन काळच्या रजपूत योद्ध्यांप्रमाणें पित्यापासून पुत्राला, पुत्रापासून पौत्राला व पौत्रापासून प्रपौत्राला हें आपल्या शत्रूचा नाश करण्याचें व्रत आज कल्पानुकल्पें दिलें जात आहे. या अज्ञानासुरास व त्याच्या असंख्य प्रजेस पार नाहींसें करून टाकण्यासाठीं मानवजातींतील दिव्यदृष्टी ऋषींनीं, करुणदृष्टी साधूंनीं, विश्वदृष्टा कवींनीं, सूक्ष्मदृष्टी शोधकांनीं, नाना प्रकारच्या आयुधांच्या साहाय्यानें असंख्य पराक्रम केले.

प्लेगच्या जंतूंप्रमाणें एकाचे दोन, दोहोंचे चार अशा प्रमाणानें क्षणोक्षणीं वाढत जाणाऱ्या त्या अज्ञानदैत्याच्या प्रजेचा शक्य तितका संहार त्यांनीं केला. त्या त्यांच्या धैर्यवीर्यांचा इतिहास या संग्रहालयांतून असतो. आपल्या पूर्वींचे पराक्रमी पुरुष कोणकोणच्या मार्गांनीं गेले, त्यांनीं काय काय आयुधें जमविलीं, शोधून काढलीं किंवा शोधून काढण्यासाठीं काय काय उद्योग केले, त्या सर्व पराक्रमांचें व उद्योगांचें स्मारक जर कोठें असेल, तर तें राष्ट्रांच्या ग्रंथसंग्रहालयांतच आहे. मानवी जीवित म्हणजे लहानसान रणांगण नव्हे; या रणांगणांत कामीं पडण्याचा प्रसंग प्रत्येकावर येतो. मनुष्य जितका काळ या रणांगणांत असेल तितका काळ त्यास धडपडच करीत रहावें लागतें; आणि त्या धडपडींत जर त्याला विशेष प्रकारचें यश आलें, तर तें आपोआप कोणाच्या ना कोणाच्या तरी नजरेस येतें; किंवा त्याचें त्यालाच तें स्मरणीय वाटून इतरांस दाखविण्यासाठीं तो वाग्द्वारानें नमूद करून ठेवतो. त्यानें तें तसें नमूद केलें नाहीं, तर त्याच्या पराक्रमांत व अनुभवांत जें कांहीं

नमूद करून ठेवण्यायोग्य असेल तें दुसरा कोणी तरी नमूद करून ठेवतो व त्याचा इतरांस उपयोग व्हावा या हेतूनें तें प्रसिद्ध करितो. या सर्व वाङ्मयाचा संग्रह जर कोणीं केला नाहीं, या मानवी जीवितरूप रणांगणांत हजारों ठिकाणीं हजारों व्यक्तींकडून अज्ञानासुराच्या सैन्याशीं चाललेल्या युद्धाचा इतिहास अनेक ग्रंथांच्या रूपानें प्रसिद्ध होत असतां जर त्या ग्रंथांचा संग्रह केला गेला नाहीं, तर त्या सर्व पराक्रमांचें चीज काय ? व पुढच्या पिढयांना तो इतिहास मिळावा तरी कसा ? मागल्यांचा अनुभव ही तर पुढच्यांचीं साधनसमृद्धि ! ही साधनसमृद्धि या संग्रहालयांतूनें असते. या साधनसमृद्धीवर पुष्कळ अंशीं पुढिलांचे पराक्रम अवलंबून असतात.

प्राचीन काळच्या राजघराण्यांत भाट म्हणून एक प्रकारचे कवि आश्रयिलेले असत. हे भाट ज्या राजवंशाचे आश्रित असत, त्या वंशाचे ते इतिहाससंग्रहच होत. पूर्वजांनीं केलेल्या पराक्रमांचें स्मरण त्यांनीं पुढच्या नव्या पिढीच्या तरुणांस द्यावयाचें. आजचे ग्रंथसंग्रह म्हणजे आपल्या पूर्वी

होऊन गेलेल्या लोकांच्या पराक्रमांचे इतिहासच होत. ग्रंथसंग्रह म्हणजे राष्ट्राचें मस्तक होय, हृदय होय, जीवित होय. बुद्धीनें, मनानें व शरीरानें, मनुष्यानें केलेल्या विजयांच्या स्मृतिनदीचा प्रवाह एकसारखा अव्याहत राहावा व त्याच्या तटाकावर कोठेंही उभें राहून श्रमलेल्या भागलेल्या लहानमोठ्या वीरांनीं त्यांतील शुद्ध जलाचें सेवन करून आपली श्रांति, आपली विषण्णता, आपलें नैराश्य हीं घालवावीं हाच या ग्रंथसंग्रहालयांचा हेतु होय. त्या स्मृतिनदीचें उद्‌गमसरोवर–त्याचा मूळ जिवंत झरा, हीं ग्रंथसंग्रहालयें होत. मूळ सांठा जितका प्रचंड असेल, त्याच्यापेक्षां सहस्रपट, नव्हे अब्जपट त्यापासून निघणारा प्रवाह बनत जातो. परंतु मूळ साठा जिवंत पाहिजे. त्यांतलें जीवन शुद्ध पाहिजे. त्याचें फार उत्कृष्ट प्रकारें जतन झालें पाहिजे. ग्रंथसंग्रहालयें स्थापन करून त्यांचें जतन करणार लोक कोणचें महत्कार्य करताहेत, हें या विवेचनावरून ध्यानांत येईल. आज एक तप आणि एक वर्ष वर झालें–या मुंबईच्या ग्रंथसंग्रहालयाला जन्म देऊन त्याची जोपासना त्याचे व्यवस्थापक आपणां सर्वांच्या

साहाय्यानें करीत आले आहेत.त्याचा नामकरण-विधि त्यांनीं केल्यास आज तेरा वर्षे झालीं. या तेरा वर्षांत दरसाल ते आपल्या पुढें आपण याची जोपासना कसकशी करीत आलों त्याचा पाढा वाचीत आले. त्या पाढ्यावरून या संस्थेला बाळसें आणण्याकरितां त्यांनीं काय काय प्रयत्न केले, ते आपल्यास माहीत झाले आहेतच. या बालकाला आतां कायमचें निवासस्थान देण्याकरितां त्यांचा उद्योग चालला आहे. त्यांत लवकरच त्यांना यश येईल अशी उमेद आहे. ती त्यांची उमेद खरी व्हावी, त्या उमेदीप्रमाणें लवकरच या संग्रहालयाला कायमचें आणि अगदीं निर्भय असें निवासस्थान मिळावें. तसें निवासस्थान त्यास मिळवून दिल्यानें केवढें मोठें--राष्ट्रीयच नव्हे, तर विश्वराष्ट्रीय काम आपल्या हातून होणार आहे हें ग्रंथसंग्रहालयांच्या महत्वाबद्दल मीं जें आपणास आतां सांगितलें त्यावरून ध्यानांत येईल. श्रमल्या भागल्या, निराशल्या, हताशल्या व त्यामुळें हात जोडून केवळ उदास व खिन्न होऊन बसलेल्या बांधवांची श्रांति, त्यांचें नैरा-

श्य, त्यांची विषण्णता हीं सर्व घालवून त्यांस ताजेंतवानें करण्याचें ज्यांत सामर्थ्य आहे, असें जर अमृतजल कोठें असेल, तर तें या ग्रंथसंग्रहरूप अमृताशयांत आहे. हा अमृताशय विस्तृत केला पाहिजे, अमृत ठेविला पाहिजे ! हें कार्य फार महत्वाचें नाहीं असें कोण म्हणेल ?

## वाङ्मय म्हणजे काय ?

या अमृताशयांत कोणचें अमृत सांठविलेलें आहे ? कोणच्या अमृताच्या संरक्षणासाठीं हीं ग्रंथसंग्रहालयें उत्पन्न केलेलीं आहेत ? यांत वागमृत सांठविलेलें असतें. वाङ्मयामृताचा हा सांठा होय. वाङ्मय म्हणजे काय ? वाङ्मय या शब्दापासून आह्मीं काय समजावें ? यावद्दल विशेष ऊहापोह मी करीत नाहीं. पूर्वीं एकदां हा ऊहापोह मीं केला होता. त्याचें सार पुनः आज आपल्यापुढें मांडून वाङ्मयाची जी एक विशेष शाखा मीं आजच्या व्याख्यानाचा विषय म्हणून निवडली आहे, तिजकडे वळूं.

[मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि जागृत करून त्यास नेहमीं सन्मार्गांत ठेवण्यास कारण होणारे त्याच्या विविध मनोवृत्तींचा विकास करून

शुद्ध अशा आनंदाचा आस्वाद त्यास देणारे, जें काय अशुद्ध, अपवित्र,दुःखद, नैराश्योत्पादी व क्षणिक–त्यापासून दूर रहाण्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष बोध करणारे, नेहमीं उदार, रमणीय अशा विचारांचा व कल्पनांचा त्याच्या मनांत उद्भव व संचार करवून सत्याचे ठिकाणीं तो सदा लीन होईल असें करणारे, या जीवितसंग्रामांत त्यास नेहमीं उत्तेजित ठेवून विजयोत्सुक करणारे, सारांश त्यास मनुष्यत्वांतून काढून देवत्वाकडे जाण्याबद्दल उत्सुक करून त्या मार्गाला सन्मुख करणारे,– असे जे कोणाचेही अंतःस्फूर्तीनें शब्दरूप घेऊन मुखावाटे बाहेर पडलेले, किंवा लेखणीनें लिहून ठेविलेले विचारोद्गार, त्या सर्वांना समुच्चयानें वाङ्मय ही संज्ञा आहे.

वाङ्मयाची ही व्याख्या फारच गुंतागुंतीची व व्यापक आहे, असें कोणी म्हणेल. परंतु वाङ्मयच खरोखर जर विश्वव्यापी आहे, तर त्याचा अर्थ पक्केपणें मनांत उभा रहाण्यासाठीं व्याख्या ठरवूं गेल्यास थोडीबहुत गुंतागुंत उत्पन्न होणारच. खरें पाहूं गेलें, तर वाङ्मय या शब्दाची व्याख्या त्याच्या घटकावय-

वांतच आहे. जो उच्चारलेला किंवा लिहिलेला शब्दसंग्रह तो समुच्चयानें वाङ्मयच. परंतु वाङ्मय शब्दानें इतका व्यापक अर्थ आपण घेत नाहीं. असा घेतल्यानें अतिव्याप्ति होईल. जो जो उपयुक्त शब्दसंग्रह किंवा वाक्यसंग्रह तो तो समुच्चयानें वाङ्मय शब्दानें जाणावा, असें म्हटलें तरी 'उपयुक्त म्हणजे काय ?' हा प्रश्न आपल्यापुढें उभा राहणारच. उपयुक्त म्हणजे उपयोगास येणारा. पण कोणाच्या व कोणच्या उपयोगास येणारा ? अर्थात् उपयोग कोणचे कोणचे, व कोणाचे कोणाचे हेंही आपल्या व्याख्येंत निर्दिष्ट केलें पाहिजे. असा सर्व विचार करून जितका बरोबर अर्थ दाखवितां येईल तितका दाखविण्याचा हेतु मनांत धरून आतां आपल्याला सांगितलेली वाङ्मयाची व्याख्या बनविली आहे. परंतु आज साधारणतः वाङ्मयाबद्दल विशेष बोलावें असा माझा हेतु नाहीं. वाङ्मयाचे जे अनेक पोटभाग आहेत, त्यांपैकीं एक विशेष आल्हादकारक व फार महत्वाचा असा भाग मीं आजच्या विवेचनासाठीं घेतला आहे.

# विदग्ध वाङ्मय.

'वाङ्मय' हा शब्द फार व्यापक आहे, विश्वव्यापक आहे, असें मीं आपणास सांगितलेंच. वाङ्मयांत सर्व कांहीं येतें. शास्त्रीय शोध व तत्संबंधीं ग्रंथ हे वाङ्मयांत अंतर्गत होतात. शास्त्र म्हटलें म्हणजे कांहीं एकच आहे असें नाहीं. सृष्टशास्त्र आहे, जीवनशास्त्र आहे, मानसशास्त्र आहे, समाजशास्त्र आहे व यः सर्व शास्त्रांच्या अंतर्गत हजारों उपशास्त्रें व मीमांसा आहेत. विद्यादेवीचें शरीर मानवी शरीरापेक्षांही किती तरी असंख्य घटकावयवांनीं बनलेलें आहे. एखादें शरीरशास्त्रावरलें सचित्र पुस्तक घेतलें व त्यांतील मनुष्यशरीराचीं चित्रें पाहूं लागलें तर आपणांस रक्तवाहिन्यांच्या जालाचें, त्याचप्रमाणें मज्जाजालाचें, स्नायुजालाचें. अशीं चित्रें दिसतात. त्या चित्रांकडे पाहिलें म्हणजे आपल्याला आपलें शरीर किती संकीर्ण व संकुल आहे, हें दिसून येतें. विद्यादेवीच्या शरीरांतील संकीर्णता व संकुलता मानवी शरीराच्या संकीर्णतेपेक्षां व संकुलतेपेक्षांही फारच अगम्य आहे. 'शास्त्रें फार अपार' हें नुसतें श्लोकांत पाठ करण्यापुरतें नाहीं. खरोखरच महासागरापेक्षांही त्यांचें अपारत्व

फार मोठें आहे. अफाट मैदानांत उभा राह-णारा माणूस सभोंवार पाहूं लागला कीं, त्यास क्षितिज कांहीं अंतरावर दिसतें व त्याला खरें ज्ञान नसलें तर तीच पृथ्वीविस्ताराची मर्यादा असें तो समजतो. परंतु तोच एखाद्या डोंगराच्या शिखरावर जाऊन उभा राहिला म्हणजे खालीं मैदानांत उभे होतों तेव्हां आपण ठर-विलेली मर्यादा अगदींच चुकली असें त्याच्या प्रत्ययास येतें. त्याचप्रमाणें ज्ञानक्षितिजाचें आहे. ज्ञानपर्वतावर जों जों उंच जावें, तों तों ज्ञानाची मर्यादा वाढत जाऊन अखेरीस ज्ञानाला मर्यादा नाहीं, अशी मनाची पूर्ण खात्री होते त्यामुळें क्षणभर ती मर्यादा शोधून काढण्याचा प्रयत्न मनुष्य सोडून देतो. तथापि ती त्याची निराशा क्षणिक असते. तो निराशेचा क्षण निघून जातांच तो पुनः ती दृष्ट मर्यादा उल्लंघावयास पहातो. निदान ज्ञान मर्यादेची विस्तृतता अधिकाधिक आपल्याला समजावी याबद्दलचे मनुष्याचे प्रयत्न कधीं कमी होत नाहींत आणि ते होऊंही नयेत. परंतु वाङ्मयाच्या या विस्तृततेचा विचार सोडून मी आज त्यांतील एका विद-

क्षित भागाचेंच थोडेंसें पर्यालोचन करणार आहें. तो भाग ' विदग्ध वाङ्मया 'चा होय.

वाङ्मय म्हणजे काय ? हें मीं आपणांस सांगितलें. परंतु याला जें एक विशेषण मीं लाविलें आहे त्या विशेषणानें मी ' वाङ्मय ' या शब्दास कोणती मर्यादा घालतों, हें सांगितलें पाहिजे. म्हणजे आजच्या प्रसंगास हाच विषय मीं कां निवडून घेतला आहे, हेंही आपल्यास समजेल.

विदग्ध शब्दाचे अर्थ संस्कृत कोशांत दिले आहेत, त्यांत " चतुर " असा एक अर्थ सांपडतो. कोणतेंही काम करावयास घेतलें, तर तें करण्याचे अनेक प्रकार व मार्ग आहेत. एकाच धंद्यांत अनेक माणसें असतात. परंतु त्यांत जीं वरवर असतात, ज्यांना लोक जास्त मान देतात, त्यांचें काम जास्त चांगलें असतें, दिसावयाला सुबक दिसतें, कारागिरी त्यांत उत्तम दिसते. तें काम ज्या उपयोगाकरित. केलें असेल तो उपयोग त्यापासून चांगला होतो. कोणच्याही प्रकारचा त्रास त्यापासून होत नाहीं; अडचण रहात नाहीं, तसदी पडत नाहीं. दुसरे साधारण कारागीर असतात तेही तें काम कर-

तात, परंतु त्याचा उपयोग चतुर कारागिरानें केलेल्या कामाइतका होत नाहीं. अर्थात् चातुर्य उपयोजून जें कार्य केलें असेल तें उपयुक्ततेच्या दृष्टीनें श्रेष्ठ व त्यांत सोय व सौंदर्य हीं आल्या कारणानें त्या दृष्टीनींही मनावर महत्वाचा परिणाम होतो. चातुर्यानें केलेल्या कामांत सौंदर्य दिसतें, उपयुक्तता वाढते. कोणचेंही काम चतुराईनें कोणीं केलें असल्यास–कलाकुशलता त्यांत उपयोजून केलें असल्यास–तें विशेष आदरणीय होतें. या कारागिराच्या कौशल्योपयोजनेस वैदग्ध–विदग्धता म्हणतात. वैदग्ध्याचा हा साधारण अर्थ झाला. परंतु वाङ्मयाच्यासंबंधांत त्याची उपयोजना करितांना, त्यांत आणखीही कांहीं विशिष्ट अर्थाचा समावेश केला पाहिजे. तो अर्थ समाविष्ट करून त्या दृष्टीनें वाङ्मय या विषयाचें आपल्यापुढें विवेचन मी करणार आहें. हा अर्थ कोणता, तें आतां आपण पाहूं. विदग्ध वाङ्मयांत आणि शास्त्रीय वाङ्मयांत फार फरक आहे. शास्त्रीय वाङ्मय म्हटलें म्हणजे निरनिराळ्या शास्त्रांतील नियमांच्या अनुरोधानें त्या त्या शास्त्रांचें विवेचन ज्यांत केलें आहे तें वाङ्मय मनांत

येतें. वैद्यशास्त्र घ्या, रसायनशास्त्र घ्या, ज्योतिःशास्त्र घ्या, भाषाशास्त्र घ्या, व्याकरण-शास्त्र घ्या किंवा आणखी कोणचेंही शास्त्र घ्या, त्यांत कांहीं ठराविक नियम बसविलेले असतात; किंवा त्या नियमांचें परिशीलन करितांना आणि ज्यांपासून नियम काढले ते मूळचे शोध निरीक्षितांना आणखीही शोध लागतात, त्या नवीन शोधांचे परिणाम काय होतात तेंही विवेचित केलेलें असतें. ते सर्व शोध व नियम साध्या रीतीनें नमूद केले व लोकांच्या–निदान त्या विषयांचा अभ्यास करणारांच्या–ध्यानांत येण्याजोगें त्याचें स्वरूपवर्णन करून दिलें किंवा तत्संबंधी ऊहापोह केले म्हणजे त्या सर्व विवेचनास त्या शास्त्राचें वाङ्मय म्हणतात. त्याचप्रमाणें इतिहास किंवा चरित्रें यांचेंही आहे. जें काय सत्य आहे तें शोधून काढून त्याची मांडणी करावयाची. हें ज्यानें पूर्णपणें कालपरंपरा व कारणप्रणाली न सोडतां केलें त्यानें शास्त्रीय पद्धतीनें इतिहास लिहिला असें होतें. सत्याचा अपलाप झाला कीं, इतिहास अशास्त्रीय ठरलाच. मग त्या

इतिहासाच्या मांडणींत कितीही कलाकुशलता उपयोजिली असली, किंवा कितीही वैदग्ध्य दाखविलें असलें तरी तें सारें व्यर्थ होय. ज्यास ज्यास आपण शास्त्र ह्मणतों, किंवा इतिहास, अथवा चरित्र ह्मणतों त्यांत वैदग्ध्य हें मुख्यांग नव्हे, तर सत्य हें मुख्यांग होय. त्यांत त्याचा अपलाप कोठेंही –अंशतःही जाणूनबुजून असो किंवा नकळत असो–मुळींही सत्यापलाप किंवा सत्यापन्हव–होतां कामा नये. सत्याचा अनादरही होतां कामा नये. शास्त्रीय व ऐतिहासिक ग्रंथांत मुख्यतः पहावयाचें तें सत्य होय. वैदग्ध्य नव्हे. चातुर्य नव्हे. तें सत्य अगदीं ठळठळितपणें मांडलें आहे असें स्पष्ट दिसून आलें तर मग कदाचित् त्याची मांडणी वैदग्ध्यानें केली आहे कीं नाहीं, हें पहाण्याकडे कोणाचेंही लक्ष्य जाईल. ज्यांत सत्याचा अपलाप केला गेला आहे असा शास्त्रासंबंधीं किंवा इतिहासासंबंधीं ग्रंथ कोणी हातांतही घेणार नाहीं. मग तो सत्यापलाप कितीही चातुर्यानें केलेला असो, तो सत्यापलापच. तें शास्त्र नव्हे, तो इतिहास नव्हे. त्यांतील रचनावैदग्ध्याची कोणास कवडीभरही

किंमत नाहीं. परंतु सत्य हें जेथें मुख्यांग -प्रधानांग-धरलें जात नाहीं, रचनाचातुर्य हें प्रधानांग धरलें जातें, त्यांत सत्याचा अ· पन्हव केला असला तरी कोणी दोष समजत नाहीं, असा एक वाङ्मयाचा भाग आहे. त्यासच मी विदग्ध वाङ्मय अथवा कलाप्रधान-चातुर्य-प्रधान वाङ्मय-असें नांव दिलें आहे. त्यास साधारणतः 'ललित वाङ्मय' असें नांव दिलें जातें. परंतु माझ्या मतें 'ललित' शब्दानें त्या वाङ्मयाच्या सत्यस्वरूपाचा पूर्ण बोध होत नाहीं. ललित शब्दांत सौंदर्य, मार्दव, सौष्ठव इत्यादि गुणांनीं युक्त असा-इंग्रजींतील Graceful किंवा fine या शब्दांचा-अर्थ व्यक्त होतो. परंतु 'विदग्ध' शब्दांत जो अर्थ आहे असा माझा समज आहे, तो अर्थ ललित शब्दांत किंवा इंग्रजींतील Graceful, fine वगैरे शब्दांत येत नाहीं. इंग्रजींत ज्याला "Belles lettres" असें म्हणतात, त्याला आपण 'ललित वाङ्मय' असें म्हणूं. कारण "सौंदर्य-दर्शन" हा त्या वाङ्मयांतला मुख्य गुण आहे. परंतु "Artistic literature"

या शब्दाची योजना ज्या वाङ्मयविभागा-संबंधानें करतां येईल तो वाङ्मयविभाग ' विदग्धवाङ्मय ' या शब्दांनीं मी उद्दिष्ट करतों. यांत पांडित्यास प्राधान्य नाहीं चातुर्यास– वैदग्ध्यास– प्राधान्य आहे. त्याचप्रमाणें या वाङ्मयांत सत्यदर्शन हा प्रत्यक्ष हेतु नव्हे हें मी आपल्याला प्रथम सांगितलेंच. परंतु सत्यदर्शन हा अप्रत्यक्ष हेतु असतो हें मात्र विसरूं नये. कां कीं, माझ्या मतें सत्यापलाप ज्यांत केलेला असतो– मग तो प्रत्यक्ष केलेला असो किंवा अप्रत्यक्ष केलेला असो–तें ' वाङ्मय ' या शब्दाच्या अर्थांत येऊंच नये. अर्थात् विदग्ध वाङ्मय या शब्दांतही मी त्याचा अंतर्भाव करूं इच्छीत नाहीं. सत्यदर्शन हा सर्वच वाङ्मयाचा मुख्य हेतु. तोच आरंभ, तोच मध्य आणि तोच शेवट. तेव्हां सत्य ज्यांत विशदही नाहीं किंवा गुप्तही नाहीं, प्रकटही नाहीं किंवा प्रच्छन्नही नाहीं, तें विदग्ध असो कीं अविदग्ध असो तें वाङ्मयच नव्हे. सत्य हा वाङ्मयाचा गुप्त हेतु. विदग्ध वाङ्मयांत सत्य प्रच्छन्न, गुप्त, अप्रत्यक्ष असतें तें शोधून काढावें लागतें. तें धर्मतत्वाप्रमाणें गुहेंत

~~घालून ठावलेलें~~ असतें, त्याच्या प्राप्तीचे मार्ग मात्र निर्दिष्ट केलेले असतात. ते कौशल्यानें दाखविले जातात. सौंदर्याच्या आश्रयानें, आनंद उत्पन्न करून, सत्याचा संचार मनुष्याच्या मनांत करवून दिला जातो, तो या विदग्ध वाङ्मयानें होय. लहान मुलांस औषध द्यावयाचें असलें तर तें पुष्कळशा साखरेंत घालून त्याच्या बाह्यांगावर व रुचीवर मूल भुलेल असें करून द्यावें लागतें. परंतु हेतु काय ? तर मुलाचा रोग दूर व्हावा; त्याचें जीवित सुंदर व्हावें. तें शर्करावगुंठित औषध आरोग्यदानासाठीं जें करतें, तें विदग्ध वाङ्मय सत्यप्रसारासाठीं करतें. त्याचा हेतु सत्यप्रसाराचाच. परंतु मनुष्याच्या मनांत आनंद उपजविणारे जे मार्ग, त्या मार्गांचा आश्रय धरून विदग्धवाङ्मय त्याच्या मनांत सत्याचा संचार करवितें. सत्याचें महत्व त्याच्या प्रतीतीस आणून देतें. कांहीं रोगांच्या निवारणार्थ कांहीं औषधें अंगांत लौकर भिनविण्याकरितां कोठें तरी टोंचून घालावीं लागतात. तीं घालण्यास दुसरा उपाय नसतो. अशा वेळीं रोग्याला दुःख होऊं नये म्हणून जेथें टोंचावयाचें, ती

शरीराची जागा डॉक्टर बधिर करतात. त्याप्रमाणेंच सत्य मनांत बिंबविण्यासाठीं प्रत्यक्षपणें सत्य मनुष्याच्या मनांत घालण्याचा उद्योग न करतां, दुसऱ्या कांहीं मोहक वस्तूंनीं त्याचें मन आकर्षून घेऊन—मनाला एक प्रकारची बधिरता आणून—मग त्यांत सत्याचें महत्व ठसवून देण्यासाठीं 'विदग्ध वाङ्मया-' ची उत्पत्ति झाली.

स्वादु काव्यरसोन्मिश्रं
वाक्यार्थमुपभुञ्जते ।
प्रथमालीढमधवः
पिबन्ति कटुभेषजम् ।

आतांपर्यंत मीं पांचचार वेळ सांगितलेंच कीं, विदग्ध वाङ्मयांत सत्य हा अप्रत्यक्ष हेतु असतो. त्यावांचून त्याची प्रतिष्ठा नाहीं, ही गोष्ट खरी, पण सत्य त्यास तळाशीं ठेवावें लागतें. आणि प्रत्यक्ष हेतु निराळाच दाखवावा लागतो? तो हेतु कोणता ? तर आनंदोत्पादन होय. आनंद उत्पन्न करावयाचा, मनाचें रंजन करावयाचें. तो आनंद जितका शुद्ध असेल, तितका श्रेष्ठ होय. तें रंजन जितकें शुद्ध, निर्मल अशा साधनांनीं होईल तितकें इष्ट होय. हा आनंद,

हें रंजन, उत्पन्न करण्यास शुद्ध व निर्मल साधनें कोणतीं ? त्याचा आतां आपण थोडयाच अवकाशांत विचार करूं.

आनंद उत्पन्न करणें, हाच विदग्ध वाङ्मयाचा उद्देश–प्रधान उद्देश–होय, असें धरावें लागतें. परंतु वास्तविक तसें नव्हे. कित्येक वाङ्मय-मीमांसाकार, विदग्ध वाङ्मयाचा प्रधान व एकच उद्देश आनंदोत्पादन हाच होय; त्यापासून सत्याचा बोध किंवा नीतीचा बोध झालाच पाहिजे असें नाहीं, असें प्रतिपादन करितात. परंतु मला तीं त्या मीमांसकांची मीमांसा मान्य नाहीं. काउन्ट लिओ टॉल्स्टॉय यांचें मत दिसण्यांत असें दिसतें, परंतु वस्तुतः तसें नाहीं. कां कीं, त्यांचें म्हणणें 'कला म्हटली म्हणजे ती सत्यनिष्ठच असली पाहिजे' तच खरें आहे. त्यांचें म्हणणः

I do not demand that art is to be a moralising influence. I only demand that it shall be interesting. It can only be interesting when it is upright and express humanity. There are only three

requisites necessary in Art—uprightness, uprightness and finally uprightness.

विष्णुशर्मा पंडितानें कोल्ह्यांकुत्र्यांच्या गोष्टी सांगून केवळ आनंदच उत्पन्न केला काय? कालिदासानें काव्यें-नाटकें लिहून लोकांस नुसतें रमविलेंच काय? शेक्सपिअरनें नाटकें लिहिलीं त्यांचीं अजून लोक पारायणें करितात, तीं केवळ करमणूक म्हणूनच काय? या प्रश्नांचें उत्तर "होय" असें कोण देईल?

आनंदोत्पादन, मनोरंजन, करमणूक हा एवढाच हेतु धरून कोण्याही महाकवीनें, किंवा नीतिबोधकारानें आपलीं काव्यें किंवा गोष्टी हीं रचिलीं नाहींत. वाल्मीकीनें आपलें रामायण, होमरनें आपलें ईलिअड, विष्णुशर्म्यानें आपलें पंचतंत्र व इसापानें आपल्या गोष्टी हीं कांहीं केवळ मनोरंजक बाडें किंवा गमतीदार चुटके म्हणून निर्माण केलीं नाहींत, तर मनुष्यांस निदान अज्ञजनांस राजमार्गानें सत्य व सत् यांचें ज्ञान नको, म्हणून रंजनाच्या मार्गानें तें त्यांस देण्यासाठीं निर्माण केलीं. लोकांना सत्यमार्ग हवा व सन्मार्गही हवा,

सत्यज्ञान हवें व नीतिबोधही हवा, परंतु तीं नुसतीं सरळ शब्दांनीं नकोत; सजवल्या नटवल्या शब्दांनीं चित्रित करून हवींत. रोग दूर होण्याचा उपाय पाहिजे, बरें व्हावयास पाहिजे, परंतु औषध कडू, आंबट, तुरट नको. औषध तसें असलें तरी निदान त्याचें अनुपान अगदीं मधुर पाहिजे; आणि तें जें मधुर अनुपान तेंच औषध, अशी कल्पना बनवून घेऊन त्यांतून खऱ्या औषधाचें सेवन करावें व बरें व्हावें, ही ज्याची त्याची लालसा. सत्याभासाविषयीं प्रेम मनुष्याला अगदीं स्वाभाविक असतें. त्याचें उत्कृष्ट उदाहरण इसापानें आपल्या एका काल्पित कथेच्या द्वारें आपल्या पुढें ठेविलें आहे. ती कथा आपल्या लक्षांत असेल. 'नकल्या आणि गांवंढकरी' यांची ती कथा होय.

एक नकल्या नानाप्रकारच्या पशुपक्षांचे स्वर काढून नकला करीत असे. त्यांत डुकराच्या केंकाटण्याची नक्कल तर तो फारच उत्तम करी, अशी त्याची ख्याति झाली होती. एके दिवशीं तो एका गांवढ्यांत नकला करीत असतां शेवटीं डुकराच्या केंकाटण्याची त्यानें नक्कल केली, ती

ऐकून सर्व गांवढेकऱ्यांनीं टाळ्या पिटून त्याची फारच वाहवा केली. परंतु त्या श्रोतृसमाजांतला एक गांवढेकरी उठून म्हणालाः 'याच्या या डुकराच्या केंकाटण्याच्या नकलेपेक्षां मी किती तरी चांगली व हुबेहूब नक्कल करून दाखवीन.' श्रोतेमंडळी हंसली व त्यास ह्मणालीः "ही गोष्ट अशक्य, पण एकदां होऊन जाऊं द्या आपली करामत." गांवढेकरी लागलाच उठला, थोडा बाहेर गेला व एक पासोडी पांघरून आंत आला; जेथें नकल्या उभा होता तेथें उभा राहून पासोडी तोंडावरून घेऊन डुकराच्या केंकाटण्याची नक्कल करूं लागला. परंतु त्याची नक्कल कोणास आवडली नाहीं. जो तो त्याची नक्कल अगदींच गचाळ म्हणून हुर्यो करूं लागला! तेव्हां त्यानें आपली पासोडी दूर फेंकून दिली आणि कांखेंतलें डुकराचें पिलूं लोकांपुढें करून ह्मटलें, "पहा हो तुमची अक्कल! तुम्हांला अस्सल तें खोटें आणि नक्कल तें खरें असें भासतें! आतां मी केंकाटलों नाहीं. डुकर केंकाटलें! पहा तुह्मी खोटयाचा कैवार आणि खऱ्याचा धिक्कार कसा करतां तो!"

या गोष्टींचें तात्पर्य मीं विशद करून दाखवावयास पाहिजे असें नाहीं. यांत मनुष्यस्वभावाचें इंगित बरोबर चित्रित केलें आहे. गोष्ट याप्रमाणें घडली असेल, असें नाहीं; परंतु गोष्ट घडण्याचा संभव फार. ही संभवनीय गोष्ट कल्पून सांगून इसापानें मनुष्याचा सत्यस्वभाव सांगितला ! आपल्या श्रोत्यांचे मनास पटविला ! असत्याच्या साधनानें त्यांच्या मनावर सत्य बिंबाविलें. हेंच कार्य चित्रकार, कथाकार व कवि करीत असतो. सत्यनीति व सन्नीति लोकांचे मनावर बिंबविण्यास असत्याचा आश्रय चित्रकार व कवि करितात तो अशाचकरितां. मनुष्यास कल्पनाचित्रांपासून म्हणजे सत्याभासापासून आनंद होतो म्हणून सत्याभासाच्या साधनानें चित्रकार व काव्यकार लोकांस सत्यप्रत्यग आणून देतात. सत्यप्रत्यय आणून देण्याकरितां हें असत्य असें इंद्रजाल तुमच्यापुढें उभें करतों आहें, असें म्हणत सुद्धां नाहींत. इंद्रजालाच्या दर्शनानें लोकांना आनंद होतो, तर त्यांचे पुढें इंद्रजाल पसरून त्यांस आपण पहातों तें खरेंच पहातों आहोंत असें भासवितात पण सत्याचें स्तन्य त्या इंद्रजालाच्या द्वारें न कळत

वाचकांच्या श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या पोटांत जात असतें. कवि व चित्रकार यांच्या कलेचें कौतुक करावयाचें, तें याच कारणाकरितां. कवि व चित्रकार आपल्या कल्पनेचा उपयोग करितात तो हें इंद्रजाल उत्पन्न करण्याकरितां! कल्पनाशक्ति–प्रतिभा–ही एक दैवी देणगी आहे. या देणगीसंबंधानें जर्मन महाकवि **गअटे** यानें ह्मटलें आहेः–

It ( Imagination ) should not deal in facts, nor be employed to establish facts. Its proper province is art, and there its influence should operate like sweet music, which awakens our emotions and makes us forget the cause by which these emotions are awakened. जेवढ्या म्हणून विदग्ध कला आहेत, त्या सर्वांचा उत्पात्तिहेतु हाच कीं सत्यप्रसार करावयाचा, परंतु तो सत्य वस्तूंचें वर्णन करून नव्हे तर कल्पित **सत्याभास** उत्पन्न करून करावयाचा. गायन वादन, नर्तन, कवित्व, नाट्य, चित्र

इत्यादि कला या विदग्ध कला होत; आणि कवित्व, ज्यांत नाटकरचना, कथाकथन यांचा अंतर्भाव होतो, तेंच विदग्ध वाङ्मय होय. पांडित्य आणि वैदग्ध्य यांत अंतर आहे. भवभूतीनें आपल्या मालतीमाधवांत तें स्पष्ट करून दाखविलें आहे. नाटक रचणाऱ्या कवींत काय काय गुण असावे लागतात त्यांचें वर्णन करतांना त्यानें ह्मटलें आहे:

यद्वेदाध्ययनं तथोपनिषदां सांख्यस्य योगस्य च
ज्ञानं तत्कथनेन किं न हि ततः काश्चिद्गुणो नाटके॥
यत्प्रौढत्वमुदारता च वचसां यच्चार्थतो गौरवं
तच्चेदस्ति ततस्तदेव गमकं पांडित्यवैदग्ध्ययोः॥

पहिल्या दोन ओळींत स्पष्ट असें ह्मटलें आहे कीं, नाट्यरचनेंत पांडित्याच्या बढायांचा उपयोग कांहीं नाहीं. त्याला वैदग्ध्यच पाहिजे. टीकाकारानें वैदग्ध्य म्हणजे काय त्याची व्याख्या फार थोडक्यांत पण पूर्णपणें दिली आहे. तो म्हणतो: वैदग्ध्य म्हणजे रसादियोगिप्रबन्धबन्धनकौशलम्—ज्यांत रसाविर्भाव केला आहे, अशीं-काव्यें-नाटकें—कथानकें—रचण्याचें चातुर्य.

वैदग्ध्यावांचून कवित्व नाहीं. मग तें वैदग्ध्य कोणास सहज असो, किंवा

त्यांत शिक्षितता असो. अशिक्षितपटुत्व हें शिक्षितपटुत्वापेक्षां श्रेष्ठ, ही गोष्ट खरी, परंतु पटुत्व असलें पाहिजे. कोणाला विदग्धता नैसर्गिक असेल, कोणाला ती श्रमसिद्ध असेल. झऱ्याचें पाणी झऱ्यापासून लागलीच ज्याला मिळतें तो दैववान्; परंतु कालव्यानें नेलेलें झऱ्याचें पाणी सांठविणारा अगदीं टाकाऊ नव्हे. कवि हा निसर्गसिद्ध असावा लागतो. उपजत अंगस्वभावाचा कवि तो खरा कवि. परंतु उपजत अंगस्वभावाच्या कवीलाही कृत्रिम साधनांचा उपयोग करून, सौंदर्य नीटनेटकें करावें लागतें. सहजगत्या सुंदर वळण लागलेल्या वनलता, उद्यानांत मालाकारानें नीटनेटक्या तऱ्हेनें वळण लावून दिलेल्या लतांपेक्षा अधिक आनंदकारक हें म्हणणें खरें केव्हां? 'दूरीकृताः खलुगुणैरुद्यानलता वनलताभिः' असें म्हणतां येतें केव्हां? त्या वनलतांनीं उद्यानलतांसारखें सुंदर वळण आपोआप लावून घेतलेलें असेल तेव्हां. शकुंतला व तिच्या सख्या क्षौमादि वस्त्रांनीं आच्छादिलेल्या नव्हत्या, त्यांच्या चरणास आलक्ताची कृत्रिम रक्तिमा नव्हती, त्यांस सुवर्णमौक्तिकहीरकादिकांचे दागिने

नव्हते, तरी पण दागिन्यांची अपेक्षा त्यांस नव्हती असें नव्हे. त्यांचें नैसर्गिक सौंदर्य त्यांनीं बाहेरून आणलेल्या प्रसाधनांनीं अधिक मनोज्ञ केलें नव्हतें असें नव्हे. शिरीष-कुसुमांनीं व किसलयवलयांनीं त्यांनीं आपल्या सुंदर शरीरांस अधिक सुंदर बनविण्याचे यत्न केलेच होते.'

अवतंसयन्ति दयमानाः प्रमदाः शिरीषकुसुमानि

असें आरंभीं ह्मणण्यानेंच कवीनें स्पष्ट सूचित केलें आहे कीं, निसर्गसुंदरांना सुद्धां कांहीं प्रसाधन—कांहीं अलंकार—कांहीं भूषण—अर्थात् सौंदर्याचा उठाव दाखवितां येईल असें साधन लागतें ! त्या साधनाची लालसा त्यांना असते. 'जातीच्या सुंदरांना **कांहींहीं** चालतें' असें म्हणण्यांतच **कांहीं** तरी पण लागतें असें सिद्ध होतें. तुकाराममहाराजांची वाणी अगदीं स्वभावसुंदर, तरी पण तिला अभंगच्छंदाचा आश्रय करून त्यांत नियमित स्थळीं नादसाम्य उत्पन्न केल्यानें श्रुतिमाधुर्य आलें. सारांश काय कीं, निसर्गसौंदर्य असलें, तरी त्याला ठीकठाकपणानें अधिक मोहकपणा येतो; आणि हा जो ठिकठाकपणा आणण्याचें चातुर्य तीच कला होय.

## कला ह्मणजे काय ?

कला कला ह्मणजे काय ? तींत कांहीं आपल्याजवळ नसलेलें कोणास आणून घालावें लागत नाहीं. आणून घालणें शक्यही नाही. गायन, वादन, नर्तन, कविता, वक्तृत्व, नाट्य या सर्व विदग्ध कला होत. यांस कला कां ह्मणतात ? मनुष्याच्या कंठाबाहेर कांहीं स्वर आहेत काय ? मृदंगादिकांवर हातांनीं वाजवितां येणारे नव्हेत असे स्वर मनुष्य त्यांतून काढूं शकतो काय ? त्याच्या पावलांनीं करतां येईल व अंग-विक्षेपांनीं सजवितां येईल असेंच नृत्य तो करतो. तो काव्य रचितो, त्यांत शब्द-योजना त्याच्या भाषेच्या बाहेरली असते काय ? त्याचे दृष्टांत अनुभवाबाहेरले असतात काय ? त्याच्या कल्पनेंतले प्रसंग व्यक्तिशः कांहीं विचित्र असतात काय ? त्यानें निर्माणलेलीं पात्रें कल्पनातीत असतात काय ? तो वक्तृत्व करतो, तेव्हां तरी भाषा कोठली असते ? आणि अंगविक्षेप कोठले असतात ? स्वरांस उच्चनीचपणा दिला जातो तो कोठला ? सर्व कांहीं मूळापासूनच असतें. कला म्हटली

म्हणजे काल आणि परिस्थिति, साध्य हेतु आणि साधन यांना बरोबर उपयोगी पडतील असे स्वर, असे शब्द, असे दृष्टांत, असे प्रसंग, असे अंगविक्षेप, हे यथोचितपणें उपयोजावयाचें चातुर्य. हें अभ्यासानें किंवा सहज–ह्मणजे अल्प प्रयासानीं ज्याला साधलें, तो उत्तम गायक, तो उत्तम वादक, उत्तम नर्तक, उत्तम कवि, उत्तम कथाकार, नाटककार, वक्ता व नट होय. सर्वांचीं साधनें सृष्टींत मनुष्याला उपलब्ध अशींच असतात. परंतु ज्याची त्याची योजकता, ज्याचें त्याचें चातुर्य, हींच त्याची कला-ती कला त्याला उत्तम, मध्यम, अधम ठरविते.

त्याचें योजनाचातुर्य हेंच त्याचा विशेष. Art is law unto itself, असें ह्मटलें आहे. त्याचा अर्थ केलेला निर्बंध नाहीं, असा नव्हे. 'कला' ही नियमबद्ध असतेच, नाहीं असें नाहीं. तिला नियमबद्धता नसली तर तिला कोणी कला म्हणणार नाहीं. परंतु तिच्या नियमांची उत्पादक तीच. लोकतंत्री राज्यांतल्या प्रमाणें तिचे नियम तीच तयार करते व त्या नियमां-प्रमाणें वागते. ती स्वतःचे नियम बनवून

त्याप्रमाणें वागणारी नसती तर तिला कला म्हणतां आलें नसतें. दुसऱ्यानें घालून दिलेल्या कडक नियमानेंच चालवयाचें, त्याच्याबाहेर जावयाचें नाहीं, हा नियम मात्र तिला आवडत नाहीं . तसा निर्बंध कलाभक्त मानते तर कोणत्याही कलेचा उत्कर्ष कधींच झाला नसता. तिच्या उत्कर्षाचें कारण तिच्या भक्तांस तिला नवीन स्वरूप देण्याचें स्वातंत्र्य हेंच होय. तसें स्वातंत्र्य नसतें तर तानसेन, सदारंग, अदारंग, मिया, वगैरे गायकांना आपापले राग, आपापल्या रागिण्या, आपापल्या चिजा उत्पन्न करून गायनकलेवर आपलीं नवीन भूषणें चढवितां आलींच नसतीं. भिन्न भिन्न चित्रकारांचे व कवींचे भिन्न भिन्न विशेष दिसलेच नसते. कलेचे नियम विटाळयासारखे नाहींत. तिच्या भक्तांस स्वैर संचार करून– दिग्विजय करून–वाटेल तीं भूषणें आणून आपल्या उपास्यदेवतेला आपल्या रुचीप्रमाणें सजविण्याचा अधिकार आहे. कलेला मर्यादा म्हणजे अंतर्बाह्य सृष्टीचीच मर्यादा. शरीर-सामर्थ्य व मनःसामर्थ्य यांचा चातुर्यानें उप-

योग करून जें निर्माण करतां येईल तें भूषण निर्माण करावें व आपल्या उपास्यदेवतेवर भक्तांनीं चढवावें. तें सौंदर्योत्पादी ठरलें, आल्हादकारक ठरलें तर त्या त्या कलेच्या अंगावरलें कायमचें लेणें होऊन बसलेंच म्हणून समजावें.

## गायनकलेचें उदाहरण.

माझ्या म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ गायनकलेचें उदाहरण घेऊं. गायनांत सप्तस्वर मुख्य व कोमलादि आणखी उपस्वर आहेत. त्याचप्रमाणें स्वरांचा प्रस्तरही अमर्याद आहे. परंतु कोणच्या स्वरामागून किती अवकाशानें कोणचे स्वर काढले असतां कोणची मनोवृत्ति जागृत होते, कोणच्या वेळीं कशी मूर्च्छना घेतली म्हणजे काय रसोत्पत्ति होते हें जाणून वेळ, स्थळ, परिस्थिति, रसाची पोषकता इत्यादि सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून, जी रचना निवडावयाची, तींतच गायकाचें खरें चातुर्य आहे. उगीच सूर काढीत बसून कितीही ताना झोडल्या तरी त्याला कोणी कला म्हणणार नाहीं किंवा विदग्धताही म्हणणार नाहीं. सप्तस्वरांतून व उपस्वरांतून एक वेळ एक, एक वेळ दोन,

एक वेळ तीन याप्रमाणें सर्व स्वर घेऊन आणि त्यांची उलटापालट करून फार प्रचंड प्रस्तर होतो. 'रागरागिण्या अनंत आहेत, गायन विद्याही अनंत आहे,' असें जें म्हणतात, त्याचें कारण हेंच. स्वरांच्या अशा उलटापालटीनें असंख्य स्वरसंमेलनें होतात. परंतु त्यांतली आनंदोत्पादी व मनोवृत्ति उचंबळविणारीं निवडून तालबद्ध करून गाणें,–याचेंच नांव गायनकला! योजनाचातुर्य पाहिजे. स्वर तेच, स्वर कांहीं भिन्न नाहींत. परंतु त्यांचे भिन्न भिन्न संयोग–तेही आणखी भिन्न भिन्न तालांनीं बद्ध केले म्हणजे त्यांत कांहीं विशेष प्रकारची मौज येते. ही मौज काढणें, कांहीं तरी नवीन मौज उत्पन्न होईल अशा प्रकारचें स्वरसंमेलन निवडून काढून तें गाऊन दाखविणें, हेंच गायनकलेंतलें इंगित होय–मर्म होय. मोटमोठ्या गायकांनीं अशीं नवीं नवीं स्वरसंमेलनें निवडून तीं गायिलीं ह्मणून तीं त्यांच्या त्यांच्या विवक्षित नांवानें प्रख्यात आहेत, परंतु आज आपल्याला गायनवादननर्तनादि कलांविषयीं कांहीं बोलावयाचें नाहीं. कला म्हणजे काय?

योजना चातुर्य ह्मणजे काय, हें दाखविण्या-साठीं फक्त गायनकलेचें उदाहरण घेतलें. विदग्ध वाङ्मयाविषयीं—ज्या वाङ्मयांत लेखकास कला—चातुर्य—उपयोजावें लागतें, त्याविषयीं बोलावयाचें आहे.

## चित्रकलेचें उदाहरण.

विदग्ध वाङ्मय ह्मणजे काय, हें मीं आपणास आतांपर्यंतच्या विवेचनांत सांगितलें. आतां त्याचा विषय कोणता तें पाहूं. हें विवेचन करतांनाही दुसऱ्या एका कलेची व या कलेची तुलना करूं. ती कला चित्रकला होय. चित्रकलेचा आणि विदग्ध वाङ्मयाचा विषय एकच. किंबहुना शास्त्र, काव्य व चित्रकला यांचा सर्वांचा विषय एकच. शास्त्राला जें काय पहावयाचें, जे काय शोध करावयाचे, ते अंतर्बाह्य सचेतन अचेतन—जड व जीवसृष्टींतच. चित्रें काढणाराला तरी विषय सृष्टीच आणि वाङ्मयाचा विषय तरी सृष्टीच. चित्रकार आपल्या कुंचल्यानें व रंगांनीं सृष्टीचें चित्र काढण्यासाठीं प्रयत्न करतो. विदग्ध वाङ्मयकार आपल्या शब्दांनीं मनःपटावर सृष्टींतील देखाव्यांचें चित्र वठविण्याचा प्रयत्न करतो. चित्रकारास सृष्टीं-

तील हुबेहूबपणा आपल्या कृतींत आणण्या-करितां नानाप्रकारचे वर्ण-रंग उत्पन्न करावे लागतात. त्यास पदार्थप्रकाश आणि छाया यांच्या धर्मांचें ज्ञान करून घ्यावें लागतें. त्यास निरनिराळ्या रंगाच्या मिश्रणानें नवीन रंग-जे सृष्टींतील पदार्थांत दृष्टीस पडतात ते--आपल्या चित्रांत आणण्यासाठीं बनवावे लागतात. चित्र-कारास अंतर्बाह्य सृष्टीचें यथातथ्य ज्ञान असल तरच त्याच्या हातून यथातथ्य चित्र वठणें संभवनीय आहे, नाहीं तर नाहीं. त्याचप्रमाणें त्यास आपले देखावे निवडून घ्यावे लागतात, त्यास आपलें चित्र उत्तम म्हणजे यथातथ्य व प्रेक्षकाच्या मनावर परिणाम करील असें बनविण्यास विवक्षित काळ, स्थळ व देखावा हीं निवडावीं लागतात. त्या देखा-व्याचें प्रतिबिंब प्रथम आपल्या मनःपटावर उठ-वून घ्यावें लागतें आणि मग चित्रफलकावर, कागदावर किंवा पटावर त्याचा उठाव जितका हुबेहूब वठेल तितका साधण्याचा प्रयत्न करावा लागतो. एखाद्या पदार्थाचा रंग हुबेहूब उठ-विण्यास त्यास किती रंगांचीं मिश्रणें करकरून पहावीं लागतात, तेव्हां त्यास पाहिजे ता रंग

बनतो. ज्याप्रमाणें जड सृष्टीचा रागरंग त्याच-प्रमाणें मनुष्याच्या किंबहुना जीवमात्राच्या मानसिक सृष्टीच्या रागरंगाचेंही त्यास ज्ञान मिळ-वावें लागतें. कोणच्या मनोविकाराचें प्राबल्य झालें असतां चर्येवर कशा प्रकारचा फरक पडतो याचें ज्ञान असल्याखेरीज चित्रकारास मनु-ष्याचें किंवा पशूचेंही यथासांग-यथाभूत चित्र काढणें शक्य नाहीं.

## रंगचित्रकार व शब्दचित्रकार.

येथपर्यंत जें चित्रकाराबद्दल, व त्याच्या सृष्टी-बद्दल सांगितलें, तें सर्व विदग्ध वाङ्मयाबद्दल म्हणजे काव्याबद्दल खरें आहे. काव्य हा विदग्ध वाङ्मयांतला मुख्य किंबहुना एकच विषय होय. तर मग काव्य म्हणजे काय ? हा अर्थातच आतां प्रश्न आला. काव्याचा विषय कोणचा, हाही प्रश्न त्याच्या मागोमाग ठेवलेला असा-वयाचा.

साधारणतः जनसमुदायाची अशी समजूत आहे कीं, काव्य म्हटलें म्हणजे छंदो-बद्ध वाणी ! कोणत्या तरी छंदांत किंवा वृत्तांत

विशेष प्रकारें शब्दरचना केली व शब्दरचनेंत नियमित स्थलीं नादसाम्य उत्पन्न केलें कीं, कविता अथवा काव्य झालें. परंतु ही अगदीं चूक आहे. ज्यांत रस नाहीं अशी छंदोबद्ध वाणी कितीही नादसुंदर असली, तरी तिला काव्य ह्मणतां येत नाहीं. इतकेंच नव्हे तर रसभरित वाणी छंदोबद्ध नसली, केवळ गद्यमय असली तरी तिला काव्य हें नांव मिळतें. ज्या ज्या शब्दसमुच्चयानें कांहीं एक प्रकारचा रसोदय होऊन मनुष्याच्या वृत्तीवर परिणाम घडतो तो तो शब्द काव्यमय होय. तो छंदोबद्ध प्रबंध असो, किंवा गद्यबंध असो. कथानक असो कीं नाटक असो सहज एखादी लहानशी **भणिति** epigram असो किंवा **गीति** ( Lyric ) असो. त्यानें कांहीं तरी मनोवृत्ति उचंबळली पाहिजे, त्यांत कांहीं रसाभ्युदय पाहिजे. 'रसोत्पत्तीला कारण काय ?' हा प्रश्न आतां आपणाला विचार करण्यास घ्यावयाचा आहे. परंतु या विवेचनाचे वेळींही स्पष्टतेकरितां आपण रंगचित्र आणि शब्दचित्र यांची तुलना करूं. त्यांच्यापासून जी रसांची उपज होते ती किती सारखी

आहे, हें पाहूं. खरें ह्मटलें तर चित्रकार हा कविच आहे व कवि हा चित्रकार आहे. दोघांचा विषय एक, दोघांचें चातुर्य एकाच प्रकारचे, दोघांचे हेतु एक; दोघांची साधनसंपत्ति मात्र भिन्न. दोघेही प्रेक्षकवाचकांच्या मनोवृत्तीवर राज्य करूं इच्छितात. चित्रकार हाही रंगांनीं वाङ्मयच उत्पन्न करतो आणि कवि हा शब्दांनीं चित्र उभें करतो. विदग्ध वाङ्मयकार हा शब्दचित्रकार होय. त्याला रंगचित्रकाराप्रमाणेंच सृष्टीचें फार सूक्ष्म निरीक्षण करावें लागतें. तसें निरीक्षण त्याचेकडून झालें नाहीं तर कधींही त्याचें चित्र बरोबर होणार नाहीं. त्या चित्रांत यथातथ्यत्व येणार नाहीं. कवितेच्या उद्भवाला कारण काय ? या प्रश्नाचें काव्यप्रकाशकारांनीं जें उत्तर दिलें आहे, तें मोठें विचार करण्यासारखें आहे.

शक्तिर्निपुणता लोकशास्त्रकाव्याद्यवेक्षणात् ।
काव्यज्ञशिक्षयाभ्यास इति हेतुस्तदुद्भवे ॥

चित्रकार काय किंवा कवि काय—( कवि या शब्दाचा व्यापक अर्थ मनांत घेऊन मी या शब्दाची योजना करतों आहें ) सृष्टिदेवीला ह्मणत असतोः—"हे माते, तुझ्या विराट

स्वरूपाचें पूर्ण ज्ञान मला होणें तर अशक्यच. परंतु त्या विराट स्वरूपाच्या अत्यंत सूक्ष्मतम अशा एखाद्या अंशाचें जरी मला थोडेंसें ज्ञान झालें व त्याचें हुबेहूब चित्र वठविण्याचें सामर्थ्य मला आलें, तरी मला फार धन्यता वाटेल. परंतु माझें एवढें कोठलें भाग्य !

To me be Nature's volume broad displayed ;
And to peruse its all instructing page,
Or happy catching inspiration thence,
Some easy passage, raptured to translate,
My sole delight.

दोघेही सृष्टिदेवीस असेंच ह्मणत असतात.

आतां मीं सांगितलेंच कीं, विदग्ध वाङ्मयांत मीं काव्याचा अंतर्भाव करतों, आणि काव्य या शब्दांत छंदोबद्ध रचनाच नव्हे, तर गद्यमय रचनेचाही अंतर्भाव करतों. मात्र त्या रचनेपासून कांहीं तरी मनोवृत्ति हालविणारा रस उत्पन्न झाला पाहिजे. ही रचना अर्थातच कृत्रिम असते. म्हणजे सृष्टींतलि एखादा देखावा जो कवी

स विवक्षित रसाचा पोषक असा वाटेल तो निवडून घेऊन त्याचें आपल्या मनावर उठणारें प्रतिबिंब कवि आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यानें योग्य शब्दांनीं चित्रित करतो. खरा चित्रकार जें डोळ्यांपुढें येईल तें चित्रपटावर रेखाटीत नाहीं. (निदान त्यानें रेखाटूं नये.) तसाच शब्दचित्रकार ही जें डोळ्यापुढें दिसेल त्याचें चित्र काढीत सुटत नाहीं. कारण प्रत्येक चित्र रसोत्पादक व मनोवृत्ति जागृत करणारें होणें शक्य नाहीं.

जें दिसलें तें गाइलें असें करून चालत नाहीं. त्यांत निवड पाहिजे. त्यांत कांहीं तरी मनोवृत्ति उचंबळविणारी, आल्हाद उत्पन्न करणारी कल्पनाचमत्कृति पाहिजे. अशी चमत्कृति नसली, तर तें काव्य नव्हे, तें शब्दचित्रच नव्हे. प्रसंगाची निवड पाहिजे इतकेंच नव्हे तर निवडलेल्या प्रसंगांतही हृदयभेदी अंश कोणचा, याचें सूक्ष्म ज्ञान पाहिजे. आणि त्याचाच तेवढा उठाव केला पाहिजे, सारांश, रंगचित्रकारास ज्याप्रमाणें Perspective दर्शनतारतम्य व प्रकाश आणि छाया यांच्या परिणामांचें ज्ञान अवश्य, त्याचप्रमाणें शब्दचित्रकारासही—कवीसही—आपल्या विषयांतील दर्शनतारतम्य

व छायाप्रकाशपरिणाम यांचें ज्ञान पाहिजे. रास्किननें "खरें रंगचित्र" कसें असावें तें ज्या शब्दांनीं वर्णिलें आहे, त्याच शब्दांनीं "खरें शब्दचित्र कोणचें" हेंही वर्णितां येईल. रस्किन् ह्मणतोः—

That only should be considered a picture, in which the spirit not the materials, observe, but the animating emotion, of many such studies is concentrated, and exhibited by the aid of long studied, painfully chosen forms; idealised in the right sense of the word, not by audacious liberty of that faculty of degrading God's works which man calls his "imagination," but by perfect assertion of entire knowledge of every part and character and function of the object, and in which the details are completed to the last

line compatible with the dignity and simplicity of the whole, wrought out with that noblest industry which concentrates profusion into point, and transforms accummulation into structure. Neither must this labour be bestowed on every subject which appears to afford a capability of good, but on chosen subjects in which nature has prepared to the artist's hand the purest sources of the impression he would convey. These may be humble in their order, but they must be perfect of their kind. There is a perfection of the hedgerow and cottage as well as of the forest and the palace and more ideality in a great artist's selection and treatment

of roadside weeds and brook-worn pebbles, than in all the struggling caricature of the meaner mind, which heaps its foreground with colossal columns and heaves impossible mountains into the encumbered sky.

*–Modern Painters Pref.*

हा उतारा माझ्या मतें फार समर्पक आहे. यांत खरें रंगचित्र कसें असावें हें सांगण्यांतच रस्किननें विदग्ध वाङ्मयांत काय काय गोष्टी असाव्या लागतात, त्यांचें थोडक्यांत सार दिलें आहे.

## काव्य ह्मणजे काय ?

काव्य म्हणजे काय हें सांगणें, त्याची व्याख्या करून देणें, फार कठिण आहे. आजपर्यंत पंडितांनीं व विदग्धांनीं अनेक व्याख्या दिल्या आहेत; परंतु जें केवळ अंतःकरणानेंच गम्य, तें शब्दांनीं गम्य करणें फार कठिण जाणारच. तेव्हां मी काव्याची नीटनेटकी आटपशीर अशी व्याख्या तयार करण्याच्या

भानगडींत पडत नाहीं. परंतु काव्य या शब्दांनीं आपल्या अंतःकरणांत काय बोध होतो याचें स्पष्टीकरण जितकें मला करतां येईल, तितकें करण्याचा यत्न करतों. तो यत्न करण्याचा आरंभ आतांपर्यंत माझ्या पहाण्यांत आलेल्या काव्यव्याख्या आपल्यापुढें मांडण्यापासूनच करावा असें वाटतें. प्रथम आपल्या प्राचीन संस्कृत वाङ्मयांत काव्यव्याख्या काय आहेत त्या पाहूं. प्रथमतः काव्यप्रकाशकाराची व्याख्या घ्या.

तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि ।

निर्दोष, गुणयुक्त, असे शब्द व अर्थ यांस काव्य म्हणावें. यांत क्वचित् अलंकार असोत वा नसोत.

साहित्यदर्पणकारांची व्याख्या अशी आहेः वाक्यं रसात्मकं काव्यम् ।

ज्यापासून कांहीं तरी रस—मनोवृत्ति हालविणारा रस—उत्पन्न होतो तें वाक्य काव्य होय.

रसगंगाधरकाराची व्याख्या पहा.

रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम् ।

मनाला रमविणारा—सुंदर असा अर्थ ज्यापासून उत्पन्न होतो, असा शब्द काव्य होय.

ज्याप्रमाणें संस्कृत भाषेंतील अलंकारशास्त्रयांच्या ग्रंथांतून कांहीं काव्यव्याख्या निवडून दिल्या आहेत त्याप्रमाणें आतां थोडया इंग्रजी आदिभाषांतील अलंकारग्रंथांतून निवडक व्याख्या देतों. त्या वाचूनहीं फार मौज वाटते.

Absolute poetry is the concrete and artistic expression of the human mind in emotional and rhythmical language.

—THEODORE WATTS.

Poetry is the attempt which man makes to render his existence harmonious.

—CARLYLE.

Poetry is the record of the best and happiest moments of the happiest and best minds.

—SHELLEY.

A drainless shower
Of light is poesy; 'tis the supreme of power;

'Tis might half-slumbering
on its own right arm.

—KEATS.

Poetry is the breath and finer spirit of all knowledge; it is the unpassioned expression which is the countenance of all science.

—WORDSWORTH.

Poetry uses the rainbow tints for special effects, but always keeps its essential object in the purest white light of truth.

—O. W. HOLMES.

Poetry is not the proper antithesis to prose, but to science. Poetry is opposed to science and prose to meter. The proper and immediate object of science is the acquirement or communication of truth; the proper immediate object of poetry the communication of immediate pleasure.

—COLERIDGE.

The true poem is the poets' mind. The finest poetry was first experience– it does not need that a poem should be long, every word was once a poem. For it is not meters but a meter-making argument that makes a poem.

—EMERSON.

Poetry is word painting.

—J. R. TRUMBULL.

Poetry is the eloquence of truth.

—T. CAMPBELL.

Poetry is a lie to realise a reality.

—VAN NOPHEN.

Poetry is the art of lying beautifully.

—HAMMERTON.

Poetry is the mixture of a lie that doth ever add pleasure.

—SIR FRANCIS BACON.

Poetry is the morning dream of great minds.

—LAMARTINE.

Poetry is the expression of the beautiful by words.

—J. Brown.

Poetry is the frolic of invention, the dance of words, and the harmony of sounds.

—F. Reynolds.

The essence of poetry is invention; such invention as, by producing something unexpected, surprises and delights.

—Samuel Johnson.

Poetry is a creative art of imitating nature.

—Aristotle.

Poetry is the rhythmical creation of beauty to elevate the soul.

—Edgar Allan Poe.

Poetry may perhaps be defined to be an art which has creation of intellectual pleasure for its object, which attains its end by the use of language natural in an excited state of the imagination and the

feelings and generally though not necessarily formed into regular numbers.

—G. Moir.

Poetry is the expression of insensuous thought in sensuous terms by artistic trope.

—Hudson Maxim.

## काव्यव्याख्यांचा निष्कर्ष.

या व्याख्यांच्या योग्यतायोग्यतेबद्दल विवेचन करून केशकर्तन करीत बसण्याचा माझा विचार नाहीं. आरिस्टॉटलानें एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें सत्य हें काढण्यास केंद्रच गांठला पाहिजे. सत्य कोणच्याही टोंकाशीं नसतें. तेव्हां या सर्व व्याख्यांच्या केंद्रांत काय आहे तें पाहूं. सर्व व्याख्यांतील शब्दांचें कंदन करून तुष काढून टाकलें तर रस आणि रामणीयक—मनोवृत्ति हलविण्याची शक्ति आणि मन रमविण्याची शक्ति या दोन शक्ति कोणच्याही व्याख्येंत खालीं राहिल्याच पाहिजेत. वाक्यांत रसाभ्युदय असेल तर तो श्रोत्याच्या चित्तांत अनुरूप रसाचा आविर्भाव करीलच करील.

करुणरसानें भरलेले शब्द श्रोत्याचें चित्त द्रव-विणारच. वीररसाचे शब्द श्रोत्यांस स्फुरण आणणारच. त्याचप्रमाणें इतर रसांचेंही आहे. परंतु याप्रमाणें शब्दयोजनेच्या सामर्थ्यानें वीर, करुणादि रसांचा आविर्भाव श्रोत्यांच्या मनांत आपोआप होतो. एखादें काव्य, एखादें कथानक किंवा एखादें नाटक वाचीत असतां त्यांत वर्णन केलेले विविध भाव वाचकांच्या, श्रोत्यांच्या किंवा प्रेक्षकांच्या मनांत तद्रूप प्रतिभाव उत्पन्न करितात. हो त्या सामर्थ्यानें युक्त अशी शब्दरचना करण्याचें कौशल्य म्हणजे विदग्ध-वाङ्मयकला होय. हें रसोत्पादनाविषयीं झालें.

आतां काव्यव्याख्येंतलें दुसरें अंग जें रामणीयक रमणीयता–मनोहरता–त्याविषयीं विवेचन करूं. वाचक, श्रोता किंवा प्रेक्षक यांच्या मनाला आनंद झाला पाहिजे तर तें काव्य खरें. त्याचें मन रमलें पाहिजे, त्याचें चित्त हरखलें पाहिजे इतकेंच नव्हे तर हरपलें-ही पाहिजे. ज्या काव्याच्या कथानकाच्या किंवा नाटकाच्या वाचनश्रवणदर्शनादिकांनीं मनुष्याचें चित्त हरपेल व हरखेल, तें काव्य

खरें. तें काव्य उत्तम. आतां हरपणें आणि हरखणें म्हणजे काय तें आपण पाहूं. एखाद्या अत्यंत प्रेमी गृहस्थाची पत्नी वारली त्याचा शोक आपण पाहिला, तर हृदय सद्गदित होतें. परंतु त्यापासून मनाला आनंद होत नाहीं. एकतानतेनें दुःखच होतें. कवीनें कल्पनेनें वर्णिलेला शोक वाचून किंवा नटानें रंगभूमीवर केलेला शोक पाहूनही हृदय सद्गदित होतें. परंतु हें सर्व कवींचें व नटांचें चातुर्य आहे, त्यांनीं आपल्यास आत्मविस्मृति पाडली असें मनांत येऊन आनंद होतो. एखाद्या लबाड भिकाऱ्यानें खोटें सांगून आपल्यास फसविलें तर राग येतो. बहुरूप्यानें फसविलें तर आनंद वाटतो. सत्य आणि सत्याभास यांचा असा संबंध आहे. अजाची पत्नी इंदुमती ही अकस्मात् वारली, आणि अज शोक करूं लागला. त्याचें कवीनें वर्णन केलें. हरिश्चंद्राची पत्नी तारामती रोहिदासाच्या मरणानें शोकाविव्हल होऊन स्मशानांत गेली; त्याचें वर्णन कवीनें केलें. हीं सर्व वर्णनें वाचीत असतां किंवा नाटकप्रयोगांत त्या त्या

पात्रांकडून त्यांचें नाटय चाललें असतां, वाचक-प्रेक्षकांच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु वाहूं लागतात. अर्जुनासारख्या महाप्रतापी वीरानें रणांगणांत गाजविलेल्या पराक्रमांच्या वर्णनांनीं वाचकादिकांस स्फुरण चढतें. शकार, यागो वगैरेंच्या दुष्टपणाचा तिरस्कार येऊन त्यांचें ताबडतोब शासन करावें असें वाटतें. हीं सगळीं लक्षणें वाचकांचें मन हरपल्याचीं लक्षणें होत. केव्हां केव्हां मन इतकें हरपून जातें कीं आपण वाचतों, ऐकतों किंवा पहातों आहोंत हें भान बराच वेळ नाहींसें होतें आणि मग कांहीं वेळानें तें ताळ्यावर येऊन वाचक आपल्याशींच

काय मला भूल पडलि भान हरपलें ।

असें म्हणूं लागतो. कवीच्या चातुर्याबद्दल त्याच्या मनाला आनंद वाटतो. कवि ज्या देखाव्याचें वर्णन करीत असेल, तो देखावा आपल्यापुढें उभा आहे असें— क्षणभरच का होईना—पण वाटून मनाला भूल पडणें, कवि ज्यांच्या सुखदुःखांच्या गोष्टी चित्रित करीत असेल त्यांच्याविषयीं क्रोध, द्वेष, अनुकंपा इत्यादि विकार मनांत उद्भवून, आपण सत्यानुभवच घेत आहोंत असें वाटणें, कवि जो

सत्यप्रत्यय आणून देण्यासाठीं दृष्टांत देईल त्याची समर्पकता मनांत बिंबणें आणि मूळ कांहीं नसून केवळ कल्पनेच्या इंद्रजालानें आपणास यानें भुलविलें असें पहातांच आनंद होणें हीं सर्व काव्याच्या उत्तमत्वाचीं मुख्य लक्षणें होत. वर्णित देखाव्यानें रसाचा परिपोष झाला असेल, त्याचा वाचकाच्या मनांत आविर्भाव होणें, आणि तो आविर्भाव केवळ कविनिर्मित सत्यभासापासून होत आहे किंवा झाला असें मनांत येऊन आनंद होणें असे दोन परिणाम काव्याच्या वाचनानें व नाटकाच्या प्रेक्षणानें होत असतात. म्हणूनच मी असें म्हणतों कीं, **काव्य म्हणजे कल्पनानिर्मित रसोत्पादी व रमणीय अशा अर्थाचा प्रतिपादक वाक्यसमुच्चय.** मग तो गद्य असो वा पद्य असो. ज्यांत विशेष मौजेचा अर्थ नाहीं, रसही नाहीं परंतु शब्दरचना मात्र श्रुतिमनोहर आहे; अर्थचमत्कृति नाहीं, शब्दचमत्कृति मात्र फार रमणीय आहे, अशा वाक्यसमुच्चयांनाही काव्य म्हणतात. नाहीं असें नाहीं. परंतु तसल्या शब्दरचनाचातुर्यास काव्य ही संज्ञा देण्यास मी तयार

नाहीं. पोप कवीनें ह्मटल्याप्रमाणें It is not poetry but prose run mad. शब्दचमत्कृति किंवा छंदश्चमत्कृति कितीही दाखविली व त्या चमत्कृतीनें क्षणमात्र वाचकास मौज वाटली तरी तीं कांहीं काव्यें नव्हत. कोल्हाट्यानें अंगमुडपणीच्या लाखों पकडा किंवा बैठकी दाखविल्या, तरी तो योगी नव्हे, इतकेंच नव्हे तर मल्लही नव्हे. आंब्याची कोय लाविल्यापासून क्षणा दोन क्षणांत फळांनीं लडलेला आम्रवृक्ष दाखविणारा गारुडी हा कांहीं सृष्टिकर्ता नव्हे, त्याप्रमाणेंच शब्दांचें निरर्थक इंद्रजाल पसरणारा शब्दपति कवि नव्हे. कोणाच्याही कृतीस काव्य म्हणण्याला तींत कांहीं कल्पनाचमत्कृति पाहिजे, रसाविर्भाव पाहिजे, रमणीयता पाहिजे आणि या त्रयींच्या जोडीला शब्दरचनाचमत्कृति असली तर विशेष मौज वाटते हें खरें, परंतु नुसतें समनादि शब्दांचें जाल काव्य या अभिधेला पात्र नाहीं.

## काव्याची प्रतिष्ठा कशावर ?

येथपर्यंत काव्य म्हणजे काय ? याचें विवेचन केलें, काव्याचा विषय काय तें

सांगितलें, काव्याचें स्वरूप कसें तेंही सांगितलें, त्याचप्रमाणें काव्याची खरी प्रतिष्ठा कशावर असते तेंही सांगितलें. काव्याची प्रतिष्ठा वस्तुतः सत्यावर, परंतु बाह्यतः सत्याभासावर असते. हें जें विधान मीं थोड्या वेळापूर्वी केलें त्याचें विशेष विवेचन आतां करतों. काव्यांत वर्णिलेली वस्तु अस्तित्वांत असतेच असें नाहीं. निदान ती जशी कवीनें वर्णिलेली असते, तशीच असते असें नाहीं. शेक्सपिअरच्या म्हणण्याप्रमाणें कवि बहुशः शून्याला जगदाकार देतात! कल्पनासृष्टीला नामरूप अर्थात् अस्तित्व देतात! तें झालें काय हें सांगण्याच्या भानगडींत पडत नाहींत. व्हावें काय किंवा संभाव्य काय तें सांगत असतात. जें घडलें त्याचा यथातथ्य वृत्तांत सांगून आणि त्याची पूर्वपरंपरा व कारणप्रणाली देऊन तें जसें घडलें तसें वर्णिलें तर तो इतिहास झाला. त्यांत विदग्ध वाङ्मयाचीं लक्षणें असलींच पाहिजेत असें नाहीं. किंबहुना तीं जर असलीं, इतिहास जर काव्यमय झाला, तर तो इतिहास या दृष्टीनें विश्वासपात्रतेला मुकला. काव्यांत कवीच्या कल्पनेचे चमत्कार

पाहिजेत आणि कल्पना म्हटली म्हणजे सत्य नव्हे. सत्यावर आश्रयलेली असेल; इतकेंच नव्हे, तर सृष्टीतील जीं काय चिरंतन व अबाधित सत्यें तीं काव्याच्या तळाशीं गुप्त ठेवावीं लागतात. घडलेल्या गोष्टींचें यथातथ्य वर्णन ह्या काव्याचा विशेष नव्हे. तो इतिहासाचा विशेष. कवि सृष्टीच्या व मानवी स्वभावाच्या चिरंतन सत्याचें चित्र काल्पनिक प्रसंगसंगम कल्पून त्याच्या द्वारें पुढें आणतो. ज्यास शास्त्र ( Science ) म्हणतात किंवा इतिहास म्हणतात त्यांचा देश निराळा आणि काव्याचा निराळा. शास्त्र व इतिहास हीं सरळ मार्गानें सत्य गांठतात. काव्य सत्याभासांतून सत्यदर्शन करवितें. कसें तें एकटया इतिहासावरूनच पाहूं या.

## इतिहास व काव्य.

विदग्धवाङ्मयाचें—काव्याचें—सर्व रहस्य सत्यांत नाहीं, तर सत्याभासांत आहे. इतिहासाचें रहस्य सत्यांत आहे. इतिहास लिहिणारानें अणुभरही सत्यापासून चळतां कामा नये. कवीला प्रत्यक्ष सत्याची अपेक्षा नाहीं, सत्या-

भासाची अपेक्षा आहे. इतिहासाचा श्रोता किंवा वाचक सत्यज्ञानासाठीं सावधान असतो. काव्याचा अर्थात् शब्दचित्राचा श्रोता व वर्णचित्राचा प्रेक्षक हे आपण असत्य ऐकत व पहात आहोंत असें धरूनच चालतात. इतिहासकार सत्यापासून किती ढळला आहे हें इतिहासाकांक्षी गृहस्थ पहात असतो. काव्याचा श्रोता व चित्राचा प्रेक्षक काव्य व चित्र हीं सत्याच्या किती जवळ जाऊन पोंचताहेत हें पहात असतात. इतिहासकार सत्यापासून अगदीं चळला नाहीं असें आढळल्यास श्रोता फारच आनंद पावतो. काव्यपाठक व चित्रप्रेक्षक हे काव्य व चित्रें हीं सत्याला पुरीं येऊन भिडलीं आहेत, असें दिसलें कीं आनंद पावतात. इतिहासापासून काय किंवा काव्यापासून काय, सत्यज्ञानच मिळवावयाचें असतें. परंतु एकाच्या द्वारें तें अगदीं प्रत्यक्षपणें निर्मळ व शुद्ध असें मिळेल अशी अपेक्षा असते व दुसऱ्याच्या द्वारें तें प्रतिबिंबाच्या रूपानें आपोआप मनांत उतरेल अशी अपेक्षा असते. इतिहासकार न्यायनिष्ठुर, त्यास आपले मनोग्रह निग्रहानें मागें ठेवून सत्यान्वेषणास अवश्य ती सामग्री

शाधींत बनावें लागतें. कवीस आपल्या मनोग्रहांस वाटेल तितकें सैरावैरा धांवण्यास सोडून अप्रत्यक्षरीत्या सत्य पुढें आणावयाचें असतें. सत्याची चाड दोघांसही सारखीच राखावी लागते. परंतु एकास सत्य सांगतों म्हणून सत्य सांगावें लागतें व दुसऱ्यास असत्य कल्पून तें सत्य भासवून त्यांतून सत्य सांगावें लागतें! एकानें जें काय पाहिलें तें, किंवा शोधून काढलें असेल तें सत्य जसेंचे तसें लोकांपुढें मांडावयाचें असतें. दुसऱ्याला जें काय दिसतें त्याचें प्रतिबिंब स्वतःच्या मनांत उठेल, त्याचें विविधवर्णवर्णित चित्र काढावयाचें असतें; परंतु खबरदारी ही घ्यावी लागते कीं, आरशांत पडणाऱ्या पदार्थप्रतिबिंबाप्रमाणें तें उलटें सुद्धां दिसतां कामा नये!

इतिहास व विदग्धवाङ्मय यांतील हे फरक मी इतके नानाप्रकारांनीं आपल्यापुढें मांडतों आहें याचें कारण इतकेंच कीं, मेकॉले व फ्रूडसारख्या चित्रेतिहासाकारांच्या ग्रंथांखेरीज कोणचेंही इतिहास (मग ते व्यक्तींचे इतिहास ह्मणजे चरित्रें असोत किंवा देशाचे असोत) किंवा निबंध खऱ्या दृष्टीनें विदग्धवाङ्मय या

सदराखालीं येऊं शकणार नाहींत. कां कीं, त्यांत अपेक्षितविषयाच्या सत्याबद्दल पुराव्याचा तराजू धरून निर्णय करण्याचा यत्न असतो, काव्यांत तें नाहीं. सर्व काव्यें, कथानकें व नाटकें आपापल्या पोटपरिवारासह विदग्धवाङ्मय या सदराखालीं येतात. इतिहास किंवा निबंध लिहिणारास निवड नाहीं. त्यास चित्राचा उठाव करून दाखवावयाचा नाहीं. त्यास सत्याच्या भासांतून सत्य दाखवावयाचें नाहीं.

## सत्य आणि सत्याभास.

कवीस, कथाकारास व नाटककारास सृष्टींतून, दैवी म्हणून वाटणाऱ्या चरित्रांतून किंवा मानवी संसारांतून वाटेल ते प्रसंग घेऊन त्यांचें चित्र वठवावयाचें असतें व त्या चित्राच्या द्वारें जगास सत्य म्हणजे काय ? सत् म्हणजे काय ? वगैरे सर्वथा हितकर अशा गोष्टी लोकांच्या मनांत बिंबवावयाच्या असतात. वाल्मीकीनें रावणाचें चित्र निर्माण केलें तें पहातांना रावण खरोखर अस्तित्वांत होता कीं नाहीं हें कोणी पहात नाहीं. रावण होता असें कवि सांगतो आणि आपल्या चातुर्यानें त्याचें चित्र श्रोत्यांच्या डोळ्यां-

पुढें उभें करतो. तो बोलला काय व कसें ? त्यानें केलें काय व कां ? यांचें सायसंगीन वर्णन तो आपल्यास देतो. हें वर्णन वाचून आपणास रावण खरा वाटतो. त्याच्या बोलण्याचालण्यांत कोठेंही असंबद्धता वाटत नाहीं. त्याच्याविषयीं जी काय कल्पना आपल्या मनांत उभी राहते, ती सुसंगत असते तींत विसंगतपणा कोठें दिसत नाहीं. त्याचप्रमाणें रामाच्या चित्राची गोष्ट. वाल्मीकीनें जें रामाचें चरित्र आपल्या डोळ्यांपुढें आणून उभें केलें आहे, त्यांत एक वेळेस अत्यंत उदात्त भाव तर दुसरे वेळेस अगदीं सामान्य मनुष्याप्रमाणें कृति आणि तिसरे वेळेस नीचकोटींतल्या मनुष्याप्रमाणें विचार असा विसंगतपणा कोठेंही सांपडावयाचा नाहीं. इतकें धोरण राहून सर्व काव्याची रचना झाली आहे. सर्व प्रकारचीं वर्णनें आलीं आहेत. यामुळेंच त्या काव्यास आपण इतकें महत्व देतों. बाणाच्या कादंबरींत सर्वच अद्भुत रस, परंतु त्या अद्भुत रसाचा परिपोष होणारीं अशींच वर्णनें देतां येतील असे देखावे व अद्भुत रसास शोभतील अशींच

पात्रें त्या कथानकांत निर्माण केलीं आहेत. पहिल्या पृष्ठापासून तों शेवटल्या पृष्ठापर्यंत सर्व-कांहीं त्या दृष्टीनें—आपण अद्भुत वातावरणांत आहोंत आणि तेथली परिस्थिति पहात आहोंत या दृष्टीनें–पाहिलें असतां कांहीं सुद्धां विसंगत दिसून येत नाहीं,या चातुर्यासच वैदग्ध्य ही संज्ञा मी देतों. आणि अशा चातुर्यानें रचिल्या जाणाऱ्या वाङ्मयास म्हणजे काव्यांस विदग्ध वाङ्मय म्हणतों. जें जें म्हणून कृतीनें केलें जातें तें तें चांगलें होण्यास चातुर्य हें पाहिजेच. परंतु ती चतुरता कांहीं एका इयत्तेच्या वर असली तरच तिला विदग्धता असें नांव देतां येतें.

## काव्यविषयाची निर्भयादता.

असा एक काळ होता कीं, तेव्हां जवढें अद्भुत किंवा दैविक तेवढेंच चित्रकलेचा किंवा कविकलेचा विषय होय, अशी साधारण समजूत होती. चित्रें काढावयाचीं झालीं, तरी तीं देवादिकांचीं, त्यांनीं पराभूत केलेल्या राक्षसांचीं किंवा फार झालें, तर यक्षगंधर्व-किन्नरांचीं. त्याचप्रमाणें काव्यें, कथानकें किंवा नाटकें करावयाचीं झालीं तरी ता अद्भुत प्रसंगांवर, देवादिकांवर किंवा यक्ष-

किन्नरांवर रचलीं जात. पुढें चित्रकार, कवि व नाटककार यांनीं एक पायरी खालीं येऊन —एक पाऊल पुढें टाकून म्हटलें तर विशेष खरें होईल—सृष्टींतीलच परंतु विशेष उदात्त, रमणीय व गभीर अशा विषयांचीं आणि मानवी सृष्टींतील विशेष गुणसंपन्न, धीरोदात्त अशा नायक-नायिकांचीं वर्णचित्रें व शब्दचित्रें रंगविण्यास आरंभ केला तरी तेवढयानेंही त्यांचें समाधान झालें नाहीं. आतां येथपर्यंत मजल आली आहे कीं, कोण-चाही सृष्टींतील देखावा किंवा कोणचीही व्यक्ति चित्रकाराच्या कुंचलीनें रंगविण्यास किंवा कवीनें शब्दचित्रित करण्यास अयोग्य नाहीं. चित्रकारांत व कवींत तें सामर्थ्य मात्र पाहिजे. कवि आपणास काय घडलें तें सांगत नाहीं. तें त्याचें काम नाहीं. तो काय घडण्याचा संभव आहे तें कल्पून सांगत असतो. केव्हां एखाद्या प्रत्यक्ष घडलेल्या हकीकतीवरून तो स्फूर्ति पावून नवीनच सत्याभास उत्पन्न करतो, तर केव्हां कशास कांहीं ठिकाण नाहीं, असा प्रसंग-संगम कल्पून त्याचें चित्र काढून त्याच्या द्वारें आपल्यापुढें इंद्रजाल उभें करतो. तेंच सत्य

असें भासवून आपल्यास गुंगवितो. तो चारुदत्ता-बरोबर आपल्यास रडवितो, शकाराबद्दल चीड आणतो, शकुंतलेच्या क्रोधाबरोबर आपल्यासही दुष्यंताबद्दल क्रोध आणतो, विदूषकाबरोबर हंस-वितो, यागोबद्दल संताप उत्पन्न करितो आणि आपल्या बायकोचा गळा दाबून खून करणाऱ्या अथेल्लोबद्दल मनांत कींव उपजवितो ! हें सर्व तो कोणच्या सामर्थ्यानें करूं शकतो ? आपल्या रचनासामर्थ्यानें आपल्या वर्णनसामर्थ्यानें. तो प्रत्येकाच्या तोंडीं असे शब्द घालतो कीं, विव-क्षित प्रसंगीं तेच शब्द त्या त्या पात्रांनीं उच्चारले असले पाहिजेत असें आपणास वाटल्याखेरीज राहतच नाहीं. तो प्रत्येकाकडून अशी कृति करवितो कीं, तीच कृति त्यानें तशीच केली असली पाहिजे असेंच वाटतें. हें कलावाङ्मय—विदग्ध—वाङ्मय—फार सामर्थ्यवान् असतें. यानें न कळत परंतु फार प्रभाववान् असा श्रोते, वाचक व प्रेक्षक यांच्या मनावर परिणाम होतो. कवि, कथाकार व नट हे समर्थ असले तर मनुष्यांचीं मनें आपल्या ताब्यांत ठेवूं शकतात. त्यांच्या मनावर आपल्या कृतींच्या द्वारें अप्रत्यक्ष परंतु विलक्षण परिणाम घडवून

आणतात. लोकांचे हातून विवक्षित कृति होतील असें करण्याचें सामर्थ्यसुद्धां कांहीं कांहीं कवि, कथाकार व नाटककारांत असतें. ते श्रोत्यांच्या, वाचकांच्या व प्रेक्षकांच्या अंतःकरणांवर हळूच हल्ला करतात व तीं आपल्या स्वाधीन करून घेतात. आतां कवींच्या दृग्पथाबाहेर असा कोणताही विषय राहिला नाहीं. सामान्यांतल्या सामान्यव्यक्तींपासून तों असामान्यांतल्या असामान्यव्यक्तींपर्यंत त्यांची दृष्टि सारखी होऊन गेली आहे. वीरांनीं मारलेल्या लढायांच्या वर्णनांनींच काय तो इतिहास बनतो हें तत्व जसें आतां गेलें, तसें असामान्य पुरुषांच्या कथा त्याच कथा आणि त्यांजवर रचलेलीं तींच काव्यें हेंही तत्व आतां गेलें. मनुष्याची समता ही आतां कवींच्या कल्पनासृष्टींतही मान्य झाली आहे. हिमालय, विंध्याद्रि वगैरे पर्वत आणि त्यांवरील वनें व नद्या एवढयाच काय त्या कवीला वर्णनीय हें आतां उरलें नाहीं. जें काय कवीच्या मनास स्फूर्ति उत्पन्न करील व त्या स्फूर्तीनें उद्गार काढवील तें सामान्य दृष्टीनें कितीही क्षुद्र असो, तें सर्व आतां कविविषयाच्या कक्षेंत

अंतर्गत झालें आहे. एखाद्या क्षुद्र ओढ्याच्या कांठीं असलेल्या झोंपडींत असणाऱ्या माणसां- पासून तों तहत राजधानींतील चक्रवर्ती महारा- जांपर्यंत सर्वांचें महत्व कवींस सारखेंच! ह्या सर्व विषयांस सजविण्यास समर्थ व त्यावरून कांहीं तरी जगास शिकविण्यास उत्कंठित अशी त्याची प्रतिभा मात्र पाहिजे. याप्रमाणें विदग्धवाङ्मयाचें साम्राज्य आतां वाढलें आहे. देवाविषयींची भक्तिमत्ता एवढीच कवींचा विषय ही कल्पना गेली. सर्व उच्चनीच, उत्तम अधम वस्तुजाता- विषयीं, अणुहून अणु व महताहून महत अशा जड व जीव सृष्टींविषयीं व विशेषतः मनुष्य- जातीविषयीं प्रेम व आदर अर्थात् भक्तिमत्ता हाही आतां त्यांचा विषय झाला. सर्व प्रकारचे उच्च नीच मनोविकार त्यांच्या चक्षुर्मर्यादेंत आले आहेत. तेव्हां या विस्तृत मर्यादेचा—या वाढलेल्या विदग्ध- वाङ्मय साम्राज्याचा फायदा पुढल्या भावी ग्रंथकारांनीं—विदग्धवाङ्मयाच्या उपवनांत आ- पल्या हातून चार वृक्ष लागावे अशी लालसा धारण करणारांनीं अवश्य घ्यावा. जें काय त्यांनीं मनांत नेहमीं बाळगावयाचें तें हें कीं,

आपल्या त्या वृक्षास सत्य आणि सत् हीं दोन फळें अवश्य लागलीं पाहिजेत. त्यास असत्याचें व असताचें खत मात्र पाहिजे. असत्याच्या भासांतून परंतु सत्य आपणास पुढें करावयाचें आहे. असताच्या निषेधानें सताची प्रगति करावयाची आहे.

इतकें सांगून मला हें व्याख्यान देण्यास बोलाविल्याबद्दल मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या व्यवस्थापकांचे आणि आजच्या अध्यक्षांनीं व आपण सर्वांनीं तें व्याख्यान शांतपणें ऐकल्याबद्दल आपले आभार मानून मी आपली रजा घेतों.

## या पुस्तककर्त्यांचीं दुसरीं पुस्तकें.

# कादंबऱ्या.

## सामाजिक.

रु.

आजकालच्या गोष्टी--गोष्ट १ ली.
मधली स्थिति सचित्र रु.२॥ २
पण लक्ष्यांत कोण घेतो ! ... २।
जग हें असें आहे ! ... ... २
भयंकर दिव्य ! ... ... २।

## ऐतिहासिक.

उषःकाल ... ... ... २
गड आला पण सिंह गेला !... १
चंद्रगुप्त ... ... ... १
रूपनगरची राजकन्या ... १।।।

**तीन नाटकें व तीन प्रहसनें.**

| | |
|---|---|
| जयध्वज.<br>श्रुतकीर्तिचरित.<br>सुमतिविजय.<br>धूर्तविलसित.<br>मारून मुटकून वैद्यबोवा.<br>जबरीचा विवाह. | १॥ |

**लहान गोष्टी** प्रत्येकीं ०४.

पुरी हौस फिटली इ.

हरवलेली किल्ली इ.

थोड्या चुकीचा घोर परिणाम.

अपकारांची फेड उपकारांनींच.

कृष्णदेव यादव इ.

काळ तर मोठा कठिण आला !

दहा रुपयांची फेड.

भुताटकीचें घर.

कसे दिवस गेले !

## उपदेशपर पत्रें.

सगुणाबाईचीं आपल्या मुलीस पत्रें ०४
गोविंदरावाचीं आपल्या मुलास पत्रें ०४
रामकृष्ण परमहंस यांचीं बोधवचनें ०४
निवळ मासला (भाग १ व २) प्रत्येकीं ०४
चुटके ०४

## चरित्रें.

चार महनीय चरित्रें ०४
आठ स्त्रीरत्नें ०८

## व्याख्यानें.

मराठी वाङ्मयाचा अभ्यास ०४
मुलांस थोडा उपदेश ( चौदा व्याख्यानें ) ०८
विदग्ध वाङ्मय ०ः

खालीं लिहिलेल्या कादंबऱ्यो अद्यापि पुस्तकरूपानें प्रसिद्ध नाहींत, परंतु हळू हळू प्रसिद्ध होतील.

| | |
|---|---|
| यशवंतराव खरे. | केवळ स्वराज्यासाठीं. |
| मी. | सूर्यग्रहण ! |
| गणपतराव. | सूर्योदय ! |
| आजच. | मध्यान्ह ! |

कालकूट.